SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004, MAHARASHTRA
PHONE : Director Office –( 0231)2609068 CAP Section –
(0231)2609317/2609110 Website – www.unishivaji.ac.in, Email – cap@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६००४, महाराष्ट्र
दुरध्वनी : संचालक कार्यालय-०२३१ २६०९०६८ मध्यवर्ती मूल्यमापन विभाग-०२३१ २६०९३१७/२६०९११०
संकेतस्थळ - www.unishivaji.ac.in, ई-मेल आयडी - cap@unishivaji.ac.in

Estd. 1962
"A++"
Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

Ref. No. SU/Exam/CAP/ 795 Date : 19/4/2025

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय : मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्र परीक्षेच्या पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या भाग – १ परीक्षेच्या (प्रथम वर्ष) उत्तरपत्रिका महाविद्यालय स्तरावर मूल्यमापनाबाबत.**

**संदर्भ : या कार्यालयाचे जा.क्र./एसयु/एक्झाम/कॅप/५२८ दि. २२/११/२०२४ रोजीचे पत्र**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयास अनुसरून पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या भाग – १ परीक्षेच्या (प्रथम वर्ष) उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन फक्त ऑक्टो./नोंव्हें. २०२४ या हिवाळी सत्राकरीता महाविद्यालय स्तरावर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

तथापि, विद्यापीठ अधिकार मंडळाने आता पुनःश्च घेतलेल्या निर्णयानुसार मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्र परीक्षेच्या पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या भाग – १ परीक्षेच्या (प्रथम वर्ष) उत्तरपत्रिका महाविद्यालय स्तरावर मूल्यमापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, **मार्च/एप्रिल, २०२५ या उन्हाळी सत्र परीक्षेच्या पारंपारिक तसेच इतर काही पदवी अभ्यासक्रमांच्या (बी.ए., बी. कॉम., बी.एस्सी. (सर्व अभ्यासक्रम), बी.बी.ए., बी.सी.ए., बी.सी.एस., बी.ए.बी.एड्., बी. व्होक सर्व विद्याशाखा) भाग – १ परीक्षेचे वेळापत्रक व प्रश्नपत्रिका विद्यापीठ स्तरावर करण्यात येणार असून सदर प्रथम वर्ष परीक्षेचे आयोजन व उत्तरपत्रिकांचे मूल्यमापन महाविद्यालयीन स्तरावर करण्यात यावे. या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबतची कार्यपध्दती व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेनंतर आपणांस स्वतंत्रपणे कळविण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.**

-२-

तसेच ऑक्टो./नोंव्हें. २०२४ या हिवाळी सत्राच्या परीक्षेसाठी (प्रथम वर्ष) काही महाविद्यालयांना परीक्षा केंद्र मंजूर होते तथापि मूल्यमापन केंद्र मंजूर नव्हते, तसेच काही महाविद्यालयांना परीक्षा केंद्र व मूल्यमापन केंद्र दोन्हीही मंजूर नव्हते, अशा महाविद्यालयांसाठी जी परीक्षा केंद्रे, मूल्यमापन केंद्रे निश्चित करण्यात आली होती त्या महाविद्यालयांना/परीक्षा केंद्राना विद्यापीठ अधिकार मंडळांनी निश्चित केलेनुसार खर्च अदा करण्यात आला आहे किंवा कसे, याबाबत तात्काळ विद्यापीठास अवगत करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत :-

1. मा. कुलगुरू कार्यालय
2. मा. प्र-कुलगुरू कार्यालय
3. मा. कुलसचिव कार्यालय
4. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ कार्यालय
5. मा. वित्त व लेखाधिकारी
6. परीक्षा विभागातील सर्व प्रशासकीय अधिकारी व सर्व परीक्षा विभाग
7. आय.टी. सेल विभागास
8. दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
9. विद्यार्थी सुविधा केंद्र
10. इंटरनेट विभागास सदरचे पत्र विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी